

# पारनेर दर्शन

वर्ष ३ अंक २३९, रविवार ३१ ऑगस्ट २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



# जरांगे यांचा सरकारला ६ दिवसांचा अल्टीमेटम

## ■ न्यायमूर्ता शिंदे यांची चर्चा निष्फळ ■ ५८ लाख कुणबी नोंदींचा खुलासा ■ १३ महिन्यांचा वेळ दिला आता एक मिनिटही देणार नाही ■ मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस

**मुंबई : प्रतिनिधी**

**मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी राज्य सरकारच्या वतीने निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांची मनधरणी केली मात्र जरांगे यांनी आपली भूमिका ठाम ठेवल्याने शिष्टमंडळाची मनधरणी फळास आली नाही. दरम्यान, जरांगे यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करताना सरकाला सहा दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.**

सातारा व हैद्राबाद गॅझेटियरमधील आधीपासून अस्तित्वात असलेल्या दाखल्यांनुसार तात्काळ जातप्रमाणपत्र जारी करावे, नाहीतर पुढच्या शनिवारी-रविवारी मराठा समाजचे लोक घरी बसणार नाहीत असा इशारा त्यांनी दिला.



### शिंदे समितीचे खुलासे

जरांगे यांच्याशी चर्चा करताना न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यचप्रया मागणीनुसार स्पष्टता दिली. त्यांनी सांगितले की, राज्य मंत्रीमंडळाने कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेस मुदतवाढ मंजूर केली आहे. महत्वाचं म्हणजे, शिंदे समितीकडे ५८ लाख कुणबी नोंदी उपलब्ध झाल्या आहेत, ज्यावरून राज्यभरातून १० लाख ३५ हजार कुणबी जात प्रमाणपत्र देण्यात आली असून २ लाख ३९ हजार प्रमाणपत्रांसाठीचे अर्ज मान्य करण्यात आले आहेत.

### अभिलेख सादर करणे आवश्यक

जात प्रमाणपत्र देण्याच्या कायद्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने त्यासाठी अर्ज करणे आवष्यक आहे. त्याबरोबरच कायदा व नियमांनी मान्य केलेले अभिलेख पुरावे सादर करणे गरजेचे आहे. सरकारची भूमिका आणि समितीची जबाबदारी कुठे थांबते यावरही शिंदे यांनी स्पष्ट मते मांडली. कोणत्याही समाजाला सरसकट प्रमाणपत्र देणे शक्य नाही, प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र प्रक्रिया असल्याचे त्यांनी सांगितले.

### जरांगे यांची ठाम भूमिका

मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की, त्यांनी १३ महिन्यांचा वेळ दिला. त्यामुळे आता कोणताही अतिरिक्त वेळ देणार नाही. मी उपोषणावरून मागे हटणार नाही. जरांगे यांनी एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला तो म्हणजे पूव ओबीसी यादीत १८० जाती होत्या,आता त्या ३५० ते ४०० कशा झाल्या ? त्यावर समितीकडून उत्तर देण्यात आले की, मागासवर्गआयोगाने नवीन जात ओबीसी प्रवर्गात घेण्याचा अधिकार ठेवला आहे. समितीला हे अधिकार नाहीत. त्यामुळे मराठा समाजाचा ओबीसी दर्जा देण्यासाठी वेगळे कायदे आणि सर्वेक्षण प्रक्रिया आवश्यक आहे.

### बीडवरून भाकरी, ठेचा, लोणचं !

मुंबईतील मुसळधार पावसाच्या विपरीत परिस्थितीत, आझाद मैदानातील चिखल, पोलीस सुविधांची कमतरता असूनही हजारो मराठा बांधवांनी आपली एकजूट दाखवली आहे. आझाद मैदान परिसरातील हॉटेल बंद ठेवण्यात आले आहेत, त्यामुळे आंदोलकांचे चांगलेच हाल होत आहेत. ते लक्षात घेऊन बीड जिल्ह्यातील साक्षाळ पिंपरी येथल गावकऱ्यांनी मुंबईतील आंदोलकांसाठी तब्बल ५० हजारांहून अधिक भाकरी, ठेचा, लोणचं पाठवून सामाजिक सहकार्याचा इतिहास रचला आहे. आंदोलकांनी पोलिसांना देखील जेवण दिले. ज्यामुळे मराठयांच्या दिलदारपणाचेही दर्शन झाले. मराठा आंदोलनातील रात्रीच्यावेळचे दृश्य अत्यंत भावपूर्ण असून आंदोलकांनी संयम आणि सहकार्याचे उदाहरण दाखवून दिले आहे. मिळेल तिथे झोपून त्यांनी पहिली रात्र काढली. अत्यंत कठीण परिस्थिती असली तरी आंदोलनाचा उत्साह तसाच कायम आहे.

### मुधोजी राजे भोसले यांचा विरोध

नागपूरच्या मुधोजी राजे भोसले यांनी स्पष्ट केले आहे की, मराठा समाजाला वेगळ्या प्रवर्गातून आरक्षण द्यावे, ओबीसीतून ते देण्यास त्यांनी विरोध दर्शविला आहे. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळातील मराठा आरक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. पण आता टिकाऊ आणि कायद्याच्या चौकटीत मराठा आरक्षण मिळणे आवश्यक असल्याच्या भूमिकेवर त्यांनी जोर दिला.

### आंदोलनामुळे वाहतूक बाधीत

आंदोलनामुळे मुंबईतील वाहतूकीवर मोठा परिणाम झाला आहे. बीएमसी आणि सीएसएमटी परिसरात ठिय्या आंदोलन झाले, ज्यामुळे शहरी जीवनावर मोठा परिणाम झाला. दरम्यान मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत त्यांच्या भूमिकेवर संताप व्यक्त केला.

### ५८ लाख नोंदींना आधार माणून आरक्षण द्या

शेतकरी समाजातील मराठा आणि कुणबी हे दोन्ही अतिशय जवळचे असून, मराठा समाजाचा एक भाग आधीच कुणबी म्हणून ओबीसीत आहे. या आधीपासून कुणबी म्हणून असलेल्या ५८ लाख नोंदींना आधार मानून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यायला हवे अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

### आरक्षणाची ताबडतोब अंमलबजावणी हवी

शनिवारी राज्य सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेली चर्चा निष्फळ ठरल्याने आंदोलन सुरूच राहणार आहे. मनोज जरांगे यांनी शिष्टमंडळाच्या चर्चेनंतर सरकारच्या अडचींवर जोरदार टिकास्त्र सोडले. त्यांनी सांगितले की, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याविना कोणत्याही प्रकारे माघार घेतली जाणार नाहही. आपल्या आंदोलनाचा शुध्द हेतू म्हणजे आरक्षणाची ताबडतोब अंमलबजावणी व्हावी हा असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

### राज्याच्या राजकारणासाठी निर्णायक विषय

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सुरू झालेले हे आंदोलन विविध दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. शिंदे समितीच्या अहवालात कुणबी नोंदीचे तांत्रीक सत्य, मनोज जरांगे यांच्या ठाम मागण्या, सामाजिक सहकार्य तसेच विरोधी पक्षाची भूमिका यामुळे हा विषय महाराष्ट्राच्या राजकारणासाठी निर्णायक बनला आहे.

### हृदयविकाराच्या झटक्याने आंदोलकाचा मृत्यू

लातूर जिल्हयातील अहमदपूर तालुक्यातील टाकळगांव येथील विजय घोगरे या आंदोलकाचा मुंबईत हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. विजय यास जे.जे.रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, मात्र डॉक्टरांनी त्यास मृत घोषीत केले. विजय याच्या निधनाने संपूर्ण आंदोलकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. यापूर्वी मुंबईकडे येताना जुन्नरजवळ सतीश देशमुख या मराठा आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यू झाला होता.

---

## तर मराठ्यांना ओबीसीमधूनच आरक्षण द्यावं लागेल

### घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी मांडला मार्ग



**पुणे : प्रतिनिधी**

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी कालपासून आझाद मैदान या ठिकाणी आमरण उपोषण सुरू केले आहे. मनोज जरांगे पाटील यांचे मराठा आणि कुणबी एकच असल्याचे म्हणणे आहे, त्यानुसार मराठा समाजाला ओबीसीमधूनच आरक्षण द्यावे, त्याशिवाय हे आंदोलन संपणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मात्र जरांगे पाटील यांची ही मागणी घटनेला धरून आहे का? याविषयी अनेक मतमतांतर आहेत. जरांगे पाटील यांची मागणी सरकार मान्य करू शकतं का? त्यांची ही मागणी घटनेला धरून आहे का? याविषयी जेष्ठ घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीत स्वच्छ शब्दात सांगितले आहे की समानतेचा अधिकार हा अधिकार आहे आणि लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठीही जी सुविधा दिलेली आहे ती अपवाद आहे आणि अपवाद हा नियमापेक्षा मोठा असू शकत नाही. म्हणून ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येणार नाही. हे जे आंबेडकरांनी सांगितले आहे तेच इंदिरा सहाणी केसमध्ये सुप्रीम कोर्टाने एकमताने मान्य केले आहे,'' असे बापट म्हणाले आहेत.

पुढे बोलताना उल्हास बापट म्हणाले की, ''मराठा आरक्षण ५० टक्क्यांच्या आतमध्ये यायला पाहिजे, आता मनोज जरांगे पाटील यांची जी मुख्य मागणी आहे ती घटनेला धरून आहे. पण ते केव्हा मिळेल त्यासाठी सुप्रीम कोर्टाने ट्रिपल टेस्ट सांगितली आहे. क्रमांक १ म्हणजे मागास आयोग पाहिजे. मागास आयोगाने त्या गटाला मागस ठरवले पाहिजे. क्रमांक २ इंपेरिकल डेटा उपलब्ध पाहिजे, जो आत्ताचा पाहिजे, जुन्या काळातील ५० वर्षांपूर्वीचा चालणार नाही आणि क्रमांक

उर्वरीत पान ३ वर

## नवी मुंबईत प्रश्न सुटला होता, मग जरांगे परत का आले?

### शिंदेंना विचारा; मराठा आंदोलनावरुन राज ठाकरेंनी सुनावले

**मुंबई : प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलकांचा जनसागर मुंबईत उसळला आहे. मुंबईतील आझाद मैदानात मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे उपोषणावर बसले आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा आरक्षणासाठी राज्यभरातील लाखो मराठा आंदोलन मुंबईत पोहोचले असून संपूर्ण मुंबई जाम झाली आहे. मुंबईत वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही, असे जरांगे यांनी काल जाहीर केले. यामुळे सध्या सरकारमध्ये मोठी खळबळ माजलेली आहे. आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक असल्याचे सरकारचे नेते सांगत आहेत.**



यामध्ये आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईतील या मराठा आरक्षण प्रश्नावर आपली प्रतिक्रिया देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. राज ठाकरे हे ठाण्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी ठाण्यातील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी राज ठाकरे यांनी मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंच्या उपोषणावर प्रतिक्रिया दिली. मराठा मोर्चा आणि मराठा आरक्षणाबाबतच्या सर्व प्रश्नांची उत्तरं ही एकनाथ शिंदेंच देऊ शकतील, असे राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे म्हणाले की, ''मराठा मोर्चा आणि मराठा आरक्षण याबाबतच्या सर्व प्रश्नांची उत्तरं हे एकनाथ शिंदेंना विचारा, तेच या प्रश्नांची उत्तरं देऊ शकतील. मनोज जरांगे हे परत का आले, हे शिंदेंना विचारा. मुंबईकरांना खूप त्रास होत आहे. एकनाथ शिंदे हे गेल्यावेळी नवी मुंबईत गेले होते, तेव्हा त्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवला होता. मग आता मनोज जरांगे हे परत का आले आहेत, ही सगळी उत्तरं शिंदे देतील.''

उर्वरीत पान ३ वर

## देवदर्शनासाठी निघालेल्यांना कंटेनरची धडक

### चौघांचा जागीच मृत्यू । मृतांमध्ये शेवगावच्या दोघांचा समावेश

**बीड : प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील नामलगाव फाट्याजवळ आज सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगाने आलेल्या कंटेनरने सहा जणांना चिरडले. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्वजण देवदर्शनासाठी पायी चालले होते, मात्र वाटेतच मृत्यूने त्यांना गाठले. बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कंटेनर चालकाला ताब्यात घेतले असून, जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, पेंडगाव येथे दर्शनासाठी जाणारे सहा जण रस्त्याने पायी चालत असताना भरधाव कंटेनरने त्यांना जोराची धडक दिली. यात चौघांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी गढी उड्डाणपुलाजवळही अशाच प्रकारे कंटेनरच्या धडकेत पाच ते सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये विशाल श्रीकिसन काकडे (रा. शेकटे, ता. शेवगाव, जि. अहमदनगर), अमोल नामदेव गरजे

उर्वरीत पान ३ वर

## भरधाव एसटीच्या धडकेत पत्रकाराचा मृत्यू

### नात गंभीर जखमी । बारामतीत भीषण अपघात

**बारामती : प्रतिनिधी**

**ओंकार आचार्य आणि त्याच्या मुलींचा वेगवान वाहतुकीच्या अपघातात बळी गेल्यानंतर एक महिनाही उलटत नाही. तोच पुन्हा एकदा बेदरकार वाहतुकीने बारामतीमध्ये आज आजोबा आणि नातीला लक्ष्य केले. या भीषण अपघातात फलटण येथील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र दिनकर भागवत (वय ५९, रा. गोखळी, ता.**



**फलटण) यांचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक खेळांमध्ये विक्रम केलेली त्यांची नात स्वरा भागवत ही गंभीर जखमी झाली आहे.**

शनिवारी सकाळी

उर्वरीत पान ३ वर





# प्रगतीमंत्र

## मेडिकल म्हणजे फक्त डॉक्टर बनणेच नाही तर 'या' करिअरलाही खूप मागणी

# लॅब टेक्निशियनला आहेत मोठ्या संधी!

**जर तुम्हाला वैद्यकीय क्षेत्रात करिअर करायचे असेल आणि जर तुम्ही उत्तम पर्याय शोधत असाल, तर १२ वी नंतर तुम्ही लॅब टेक्निशियन बनू शकता. यामध्ये ६ महिन्यांपासून सुरू होणारे अनेक अभ्यासक्रम आहेत. या करिअर पर्यायाबद्दल जाणून घेऊया...**



जर तुम्हाला वैद्यकीय क्षेत्रात करिअर करायचे असेल, तर डॉक्टर बनण्याव्यतिरिक्त इतर पर्याय आहेत. यापैकी एक म्हणजे लॅब टेक्निशियनचे काम. त्यांच्याशिवाय रुग्णाचे काम चालत नाही आणि डॉक्टरचेही काम चालत नाही. म्हणून, करिअरच्या प्रगतीसाठी हे चांगले असू शकते. वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली काम करतात, परंतु त्यांना वैद्यकीय शास्त्र तसेच प्रयोगशाळेतील सुरक्षिततेचे नियम आणि आवश्यकतांचे पूर्ण ज्ञान असते.

### लॅब तंत्रज्ञांचे काम

लॅब तंत्रज्ञ नमुन्यांची तपासणी करतात. तपासणी दरम्यान, काही नमुने पुढील तपासणीसाठी किंवा गरजेनुसार सुरक्षित ठेवले जातात. लॅब टेक्निशियन, ज्यांना एमएलटी म्हणूनही ओळखले जाते, त्यांचे काम खूप जबाबदारीचे आणि आव्हानात्मक असते. त्यासाठी खूप संयम आणि कौशल्य आवश्यक असते. ते गोळा केलेल्या डेटाची सुरक्षा आणि गोपनीयता राखण्यासाठी देखील जबाबदार असतात. इतकेच नाही तर ते निकालांचे विश्लेषण देखील करतात.

### अभ्यासक्रम...

लॅब टेक्निशियनशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, रुग्णालये, प्रयोगशाळा इत्यादींमध्ये मोठ्या संधी मिळतात. या क्षेत्रातील मागणी सतत वाढत आहे. या अंतर्गत अनेक प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. जसे की मेडिकल लॅब टेक्नॉलॉजीमध्ये प्रमाणपत्र (सीएमएलटी). हा ६ महिन्यांचा अभ्यासक्रम आहे, ज्यासाठी दहावी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. यामध्ये डिप्लोमासाठी बारावी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (पीसीबी) किंवा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) या विषयांसह बारावी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. एमएलटीमध्ये बी.एस्सी. करण्यासाठी विज्ञान शाखेसह बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### महत्त्वाच्या संस्था

- पॅथॉलॉजी विभाग, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, अलीगढ, अधिकृत वेबसाइटः www.amu.ac.in/
- दिल्ली पॅरामेडिकल अँड मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली, अधिकृत वेबसाइटः www.dpmiindia.com/
- शिवालिक इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी, चंदीगड, अधिकृत वेबसाइटः www.shivalikinstitute.org/
- पॅरामेडिकल कॉलेज, दुर्गापूर, पश्चिम बंगाल, अधिकृत वेबसाइटः www.paramedicalcollege.org/
- टीप : येथे नमूद केलेल्या संस्थांची नावे केवळ तुम्हाला माहिती देण्यासाठी आहेत. याशिवाय, देशभरात इतर अनेक चांगल्या संस्था आहेत.



# एका वर्षात योगा मास्टर बना!

## BHU देत आहे प्रशिक्षण, प्रवेश कसा मिळवायचा जाणून घ्या

**जर तुम्हाला योगामध्ये रस असेल आणि तुमच्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करून तुमचे आणि इतरांचे जीवन सुधारायचे असेल, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. बनारस हिंदू विद्यापीठाकडून एक वर्षाचा योग अभ्यासक्रम सुरू केला जात आहे.**

बीएचयूचे योग साधना केंद्र, मालवीय भवन सप्टेंबर २०२५ पासून योग शिकवणी प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करत आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांव्यतिरिक्त, अधिकारी, कर्मचारी आणि बाह्य उमेदवार देखील या अभ्यासक्रमासाठी अर्ज करू शकतात. एक वर्षाच्या योग अभ्यासक्रमाबाबत बीएचयूने अधिकृत वेबसाइटवर नोटीस जारी केली आहे. त्यानुसार, अभ्यासक्रमाचे वर्ग ऑफलाइन मोडमध्ये आयोजित केले जातील. या अभ्यासक्रमात आसन, प्राणायाम, ध्यान, योग तत्वज्ञान, योग थेरपी, योग वर्तन, शुद्धीकरण क्रियाकलाप आणि मानसिक आरोग्याशी संबंधित सैद्धांतिक आणि व्यावहारिक ज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाईल. सर्व उमेदवारांचे संपूर्ण प्रशिक्षण हिंदी भाषेत असेल आणि वर्ग मालवीय भवनातील योग साधना केंद्रात घेतले जातील.

- किती जागांवर प्रवेश? : बीएचयूच्या या योग अभ्यासक्रमासाठी २०० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर दिला जाईल, ज्यामध्ये आधीच मिळालेल्या पात्रता आणि योग प्रशिक्षणाचे मूल्यांकन देखील केले जाईल. विशेषतः स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांना मुलाखत आणि प्रवेश परीक्षेची माहिती नंतर दिली जाईल.
- कधीपासून ते कधीपर्यंत फॉर्म भरता येईल? : २१ जुलै २०२५ ते ५ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज करता येतील. अर्ज ५० रुपयांमध्ये कार्यालयातून मिळू शकतात आणि ते भरल्यानंतर, ते सर्व आवश्यक प्रमाणपत्रांसह कार्यालयात सादर करावे लागतील.
- वर्ग कधी सुरू होतील? : बनारस हिंदू विद्यापीठाच्या मालवीय भवनातील योग साधना केंद्राद्वारे चालवला जाणारा एक वर्षाचा योग अध्यापन प्रशिक्षण अभ्यासक्रम २०२५-२६ या शैक्षणिक सत्रासाठी आहे. हा अभ्यासक्रम सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल आणि विद्यार्थ्यांव्यतिरिक्त सामान्य नागरिक देखील त्यात अर्ज करू शकतात.
- आवश्यक पात्रता : या अभ्यासक्रमासाठी किमान पात्रता १२ वी उत्तीर्ण आहे. तसेच, कोणत्याही आरोग्य प्रमाणपत्र धारकाला प्राधान्य दिले जाईल. हे प्रशिक्षण सत्र सप्टेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ पर्यंत चालेल. या अभ्यासक्रमाशी संबंधित तपशील जाणून घेण्यासाठी आणि अधिकृत सूचना पाहण्यासाठी येथे क्लिक करा. इच्छुक उमेदवारांना अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी, योग साधना केंद्र, बीएचयू येथे संपर्क साधता येईल.










# दिल्ली, मुंबई की बेंगळुरू...

## शिक्षणासाठी कोणते शहर सर्वोत्तम

**महागाई वेगाने वाढत आहे. याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला आहे. जगभरात शिक्षण महाग होत आहे. शिक्षणाचा खर्च हा केवळ पालकांसाठीच नाही तर मुलांसाठीही एक मोठा चिंतेचा विषय आहे. भारतातील मेट्रो शहरे चांगली महाविद्यालये आणि नोकरीच्या संधींसाठी ओळखली जातात. या शहरांमध्ये चांगले करिअर घडवण्यासाठी जितक्या जास्त संधी आहेत, तितकीच ती राहणीमानाच्या, खर्चाच्या बाबतीत महाग आहेत. दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूपैकी विद्यार्थ्यांसाठी कोणते शहर सर्वात स्वस्त आहे... या शहरांमध्ये किती नोकरीच्या संधी आहेत आणि येथे किती चांगले जीवन आहे, हे जाणून घेऊया...**

अभ्यासासाठी सर्वोत्तम शहर तुमच्या गरजेवर आणि निवडीवर अवलंबून आहे. पण अभ्यासासाठी किंवा नोकरीसाठी कोणते शहर निवडायचे? हे ठरवण्यासाठी हा लेख तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. क्यूएस अहवालात म्हटले आहे की दिल्ली या तीन शहरांमध्ये सर्वात स्वस्त आहे. इतकेच नाही तर जगातील सर्वात परवडणाऱ्या शहरांपैकी एक आहे. मुंबई विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आहे. तर, बंगळुरूमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे जीवन खूप चांगले आहे. क्यूएस बेस्ट स्टुडंट सिटीज २०२६ नुसार, दिल्लीचा स्कोअर ९६.५ आहे. म्हणजेच, ते केवळ भारतातीलच नाही तर जगातील विद्यार्थ्यांसाठी सर्वात स्वस्त शहरांपैकी एक आहे.

### दिल्ली इतकी स्वस्त का आहे?

अहवालानुसार, दिल्लीमध्ये राहण्याचा खर्च इतर मोठ्या शहरांपेक्षा कमी आहे. येथे तुम्हाला शेअरिंगमध्ये राहण्यासाठी खोल्या मिळतात. मेट्रो शहर असल्याने, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे स्वस्त आणि सोपे आहे. तुम्ही कमी पैशात चांगले जेवण खाऊ शकता. या सर्व कारणांमुळे, विद्यार्थ्यांचा दैनंदिन खर्च कमी होतो. दिल्लीमध्ये डीयू, जेएनयू आणि जामिया, बीआर आंबेडकर विद्यापीठ (एयूडी) इत्यादी चांगली सरकारी विद्यापीठे आहेत, जिथे फी खूप कमी आहे. मात्र सुरक्षितता आणि जीवनमानाच्या बाबतीत दिल्ली विद्यार्थ्यांच्या मनावर राज्य करू शकली नाही. दिल्लीतील प्रचंड प्रदूषणामुळे विद्यार्थ्यांना ती भावत नाही.


### मुंबईः QS रँकिंग ९८

भारताची आर्थिक राजधानी मुंबई QS २०२६ च्या यादीत ९८ व्या स्थानावर आहे. स्वप्नांचे शहर म्हणून ओळखले जाणारे हे भारतातील सर्वोत्तम शहर मानले जाते. त्याचा परवडणारा स्कोअर ८६.३ आहे, परंतु विद्यार्थ्यांच्या राहणीमानाच्या बाबतीत ते चांगले असल्याचे वर्णन केले गेले आहे. सेंट झेवियर्स, NMIMS आणि IIT बॉम्बे सारख्या देशातील टॉप कॉलेजांमुळे, देशभरातील विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येतात. मुंबईत लोकल ट्रेनने येथे प्रवास करणे सोपे आहे. मुंबईमध्ये मोठ्या संख्येने वित्त, मीडिया आणि तंत्रज्ञान कंपन्या आहेत. यामुळे, येथे नोकरीच्या प्रचंड संधी आहेत. बाहेरून येथे शिक्षण घेण्यासाठी येणारे बहुतेक तरुण नोकरी मिळाल्यानंतर येथे स्थायिक होणे पसंत करतात. परदेशातून येथे कमी विद्यार्थी येतात.

### बंगळुरू : क्यूएस रँकिंग १०८

बंगळुरू हे भारताचे तंत्रज्ञान आणि स्टार्टअप कॅपिटल म्हणून प्रसिद्ध आहे. बंगळुरूचा परवडणारा स्कोअर ८४.३ आहे. हे शहर विद्यार्थ्यांना आनंदी ठेवण्याच्या बाबतीत खूप पुढे आहे. बंगळुरूला मिळालेले हे रेटिंग तीन शहरांमध्ये सर्वाधिक आहे. बंगळुरूमध्ये आयआयएससी, क्राइस्ट युनिव्हर्सिटी आणि पीईएस सारखी महाविद्यालये आहेत.

अहवालानुसार, येथील स्वस्त कॅफे, को-लिव्हिंग स्पेसेस आणि को-वर्किंग हब विद्यार्थी आणि तरुणांना आकर्षित करतात. यासोबतच, इन्फोसिस, विप्रो आणि अनेक मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांमुळे नोकरी मिळण्याची शक्यता खूप जास्त आहे. पदवी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना येथे राहणे आवडते. येथील हवामान देखील चांगले आहे.



### कोणते शहर निवडावे आणि का?

जर तुम्ही या तीन शहरांचा विचार करत असाल आणि कमी खर्चात दर्जेदार शिक्षण मिळवायचे असेल, तर दिल्ली तुमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय असू शकते. विशेषतः जेव्हा तुम्ही देशातील सर्वोच्च सरकारी विद्यापीठात शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहता तेव्हा या शहराचे मूल्य वाढते. दुसरीकडे, जर तुम्हाला आल्हाददायक वातावरण आणि अधिक नोकरीच्या संधी हव्या असतील, तर बंगळुरू चांगले आहे. मुंबई थोडी महाग आहे, परंतु येथे चांगल्या नोकरीच्या संधी आहेत आणि येथील वातावरण देखील सुरक्षित आहे.

# पैसे खर्च न करता शिका रॉकेट सायन्स

## आयआयटीने एरोस्पेस इंजिनिअरिंगचे १० मोफत कोर्सेस

**जर तुम्ही अवकाश विज्ञान, रॉकेट बनवण्याचे किंवा पुढच्या पिढीचे ड्रोन डिझाइन करण्याचे स्वप्न पाहत असाल, तर तुमच्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. तुम्हाला एकही रुपया खर्च न करता हे विषय शिकण्याची संधी मिळत आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) आता एरोस्पेस इंजिनिअरिंगमध्ये १० कोर्सेस उपलब्ध करून देत आहेत. आयआयटीचे हे सर्व अभ्यासक्रम एनपीटीईएल प्लॅटफॉर्मवर ऑनलाइन उपलब्ध आहेत. विद्यार्थी, व्यावसायिक सर्वजण यात प्रवेश घेऊ शकतात. इच्छुक उमेदवार १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत या अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करू शकतात.**



- एरोस्पेस अभियांत्रिकीचा परिचय : आयआयटी बॉम्बेने सुरू केलेला हा अभ्यासक्रम एरोस्पेस तंत्रज्ञानाची मूलभूत समज देतो. जुलै २०२५ पासून तो सुरू होईल आणि त्याची परीक्षा ऑक्टोबरमध्ये होईल.
- विमान डिझाइनचा परिचय : आयआयटी मुंबईकडून आणखी एक अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे, जो विमानांच्या डिझाइन प्रक्रियेचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण देतो. तो जुलै २०२५ पासून सुरू होईल.
- यांत्रिक कंपनाचे घटक : आयआयटी दिल्लीचा हा अभ्यासक्रम कंपन आणि उड्डाण गतिमानता सखोलपणे समजून घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. हा अभ्यासक्रम जुलैपासून सुरू होईल आणि त्याची परीक्षा २ नोव्हेंबर २०२५ रोजी होईल.विमान कामगिरीचा परिचय : आयआयटी कानपूरने एरोस्पेसशी संबंधित ४ वेगवेगळे अभ्यासक्रम तयार केले आहेत. पहिला अभ्यासक्रम विमान कामगिरीचा परिचय करून देतो. यामध्ये, विमानाच्या उड्डाण कामगिरीचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्पष्टीकरण दिले जाईल. त्याचे वर्ग जुलैपासून सुरू होतील आणि परीक्षा २१ सप्टेंबर रोजी होईल.
- विमान स्थिरता आणि नियंत्रण : आयआयटी कानपूरचा हा दुसरा अभ्यासक्रम आहे. ज्यामध्ये विमान हवेत कसे स्थिर राहते आणि ते कसे नियंत्रित केले जाते हे शिकवले जाईल. हा अभ्यासक्रम जुलैपासून सुरू होईल आणि त्याची परीक्षा १ नोव्हेंबर रोजी होणार आहे.



- डिजाइन फिक्स्ड-विंग अनमॅन्ड एरियल व्हीकल : आयआयटी कानपूरचा हा अभ्यासक्रम ड्रोन तंत्रज्ञानात रस असलेल्यांसाठी खूप खास आहे. यामध्ये ड्रोनची रचना, कामगिरी ऑप्टिमायझेशन, स्थिरता चाचणी आणि प्रोटोटाइप विकास याबद्दल माहिती दिली आहे. त्याची परीक्षा २१ सप्टेंबर रोजी घेतली जाईल.
- एअरब्रेथिंग प्रोपल्शनचा परिचय : प्रोपल्शन तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. त्याचे वर्ग जुलैमध्ये सुरू होतील आणि परीक्षा २६ ऑक्टोबर रोजी घेतली जाईल.
- अप्लाइड कॉम्प्युटेशनल फ्लुइड डायनॅमिक्स : हा अभ्यासक्रम आयआयटी कानपूर देखील देत आहे. या अभ्यासक्रमाचे वर्ग जुलैपासूनच सुरू होतील.
- स्पेस फ्लाइट मेकॅनिक्स : आयआयटी खरगपूरचा हा अभ्यासक्रम रॉकेट उड्डाण आणि कक्षीय गती वैज्ञानिकदृष्ट्या समजून घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी आहे. त्याची परीक्षा १ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे.

**या सर्व अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्याची शेवटची तारीख १५ ऑगस्ट २०२५ आहे आणि ते NPTEL द्वारे पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत.**

## शॉर्ट न्यूज

### दोन गटांत भिंगारमध्ये वाद

**भिंगार :** कॅम्प पोलीस ठाणे हद्दीतील जुना राजवाडा परिसरात एका मुलीच्या घराबाहेर जाण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद झाला. या प्रकरणी दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या आहेत. ओमकार चंद्रकांत पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सादिका सय्यद, शायबाज सय्यद आणि एका अनोळखी व्यक्तीने तक्रारदार आणि साक्षीदारांना शिवीगाळ करून धमकी दिली. याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, सादिका अलीशा सय्यद यांनी देखील स्वतंत्र तक्रार दाखल केली आहे.

### ॲड.प्रताप ढाकणे भाजपाच्या वाटेवर?

**पाथर्डी :** संघर्षयोद्धा बबनरावजी ढाकणे यांच्या केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याला राज्य सरकारने ४० कोटी रुपयांच्या कर्जासाठी हमी देण्याच्या निर्णयाचे ॲड. प्रताप ढाकणे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे कारखान्यापुढील आर्थिक अडचण काही प्रमाणात दूर झाली आहे. यामुळे ॲड. ढाकणे यांच्या भारतीय जनता पक्षातील प्रवेशाचा मार्ग सुकर झाल्याची चर्चा पाथर्डी तालुक्यात सुरू आहे.

### किरकोळ कारणावरून पत्नीला मारहाण

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील नागरदेवळे येथे किरकोळ कारणावरून पतीने पत्नीला लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना घडली. शफिया असलम सय्यद (वय २१) या मोबाईलवर बोलत असताना पती असलम निसार सय्यद याने तिला कोणाशी बोलत आहेस असे विचारले. यावरून झालेल्या वादात असलमने पत्नीला शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वेल्लूरचे ‘सुवर्ण मंदिर’ ठरतेय प्रेक्षकांचे आकर्षण!

**युवा गोपाळ तालीम गणेश मित्र मंडळाचा देखावा**
**शिरूरमध्ये देखावे पाहण्यासाठी रिमझिम पावसातही गर्दी**

**शिरूर : प्रतिनिधी**

**शिरूरच्या पाबळ फाटा परिसरातील युवा गोपाळ तालीम गणेश मित्र मंडळानेवेल्लूरयेथीललक्ष्मी-नारायण सुवर्ण मंदिराची तीस फूट उंच भव्य प्रतिकृतीसाकारली असून, हा देखावा गणेशोत्सवात प्रेक्षकांचे आकर्षण ठरत आहे.या मंडळाचा यंदाचारौप्यमहोत्सवी वर्षअसून, मंडळाने मागील २५ वर्षांपासून एकाच गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करत सण साजरा केला आहे. यंदा गणेशोत्सवाच्या निमित्तानेसामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजनकरण्यात आले आहे.**



मंडळाची स्थापना२००० सालीतत्कालीन नगराध्यक्षदिवंगत रसिकलाल धारिवाल यांच्या प्रेरणेने करण्यात आली.प्रथम अध्यक्ष नारायण पवार व राजेंद्र पवार यांच्या पुढाकारातून ही परंपरा सुरू झाली. आजही मूळ मूर्ती कायम ठेवून नव्या पिढीकडून परंपरा आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम घडवला जात आहे. सदर सजावट फायबरमधून साकारण्यात आली असून,मूळ मंदिरातील कोरीव काम, कलाकुसर आणि मध्यभागी लावलेले झुंबरअगदी तंतोतंत उभे करण्यात आले आहेत.प्रखर प्रकाशझोतामुळे रात्रीच्या वेळी देखावा अधिकच उठून दिसतो.

गणेश चतुर्थीच्या दिवशी बुधवारी (ता. २७) उद्योगपतीप्रकाश धारिवालयांच्या हस्ते गणेश मूर्तीचे पूजन करून या भव्य देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले. मंडळाचे अध्यक्षनीलेश पवार, उपाध्यक्षअमोल पवार,शिरीष नारदयांच्यासह संपूर्ण कार्यकारिणी, पदाधिकारी व कार्यकर्ते उत्सवासाठी परिश्रम घेत आहेत.

“मंडळाच्या स्थापनेपासूनच आम्ही एकाच मूर्तीची प्रतिष्ठापना करत परंपरेला जपत आलो आहोत. यंदा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्तवेल्लूरच्या लक्ष्मी-नारायण मंदिराची भव्य प्रतिकृतीसाकारत भक्ती आणि कला यांचे मिलन साधले आहे. मंडळाच्या प्रत्येक कार्यकर्त्याचे हे सामूहिक स्वप्न होते, जे यंदा साकारले गेले. गणेशभक्तांनी आवर्जून भेट द्यावी.” असे युवा गोपाळ तालीम गणेश मित्र मंडळाचे अध्यक्षनीलेश पवार यांनी सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

# मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतींना अभिवादन

मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतींना अभिवादन ही संस्मरणात्मक बातमी वाचली (पारनेर दर्शन, 30 ऑगस्ट शनिवार).
१९२८, १९३२ आणि १९३६ या तिन्ही ऑलिंपिक स्पर्धांत मेजर ध्यानचंद यांनी भारताला सुवर्ण पदके मिळवून दिली. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त २९ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.
खेळांतून शारीरिक कौशल्य आणि राष्ट्रीय अस्मितेचा जागर होत असतो. जिवंत राष्ट्राच्या त्या निशाण्या आहेत. त्यात राष्ट्रांचा इतिहासही दडलेला असतो. त्या इतिहासाचा दिवा कधी विझू नये, सदैव प्रज्वलित रहावा म्हणून अशा विविध दिनांची आपल्या राष्ट्रीय जीवनात योग्य वेळी योग्य स्थानी उजळणी झाली पाहिजे.
अळकुटी महाविद्यालयाने माजी भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने तेच कार्य केले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी वर्गाने यातून प्रेरणा घेऊन आपल्या सुवर्णमय इतिहासाचे असेच जागरण करीत रहावे.



**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहिल्यानगर**

# हिवरे बाजारात ‘एक गाव एक गणपती’ परंपरेला ३० वर्षे!

**पद्मश्री पोपटराव पवार यांच्या कल्पनेतून सुरू झालेला उत्सव आज देशाला दिशादर्शक**

**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**वस्तीनिहाय मंडळांची रेलचेल असायची, पण विसर्जन मिरवणुकीवेळी मात्र काही मंडळांमध्ये मागे किंवा पुढे घेण्यावरून वाद व्हायचे. एका गावात हा वाद बरा नव्हे, हा वाद कायमचा मिटवण्यासाठी आदर्शगाव हिवरे बाजाराचे पद्मश्री पोपटराव पवार यांनी ३० वर्षांपूर्वी ‘एक गाव एक गणपती’ ही कल्पना मांडली.**

तरूणांनी पुढाकार घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिल्याने १९९५ पासून गावात हा उत्सव एकोप्याने साजरा केला जातो. अहिल्यानगर शहरापासून सुमारे १७ किमी अंतरावर असलेले हिवरे बाजार गाव आज देशाला दिशादर्शक असे कार्य करत आहे.

वारंवार येणाऱ्या दुष्काळामुळे, रहिवाशांचे स्थलांतर आणि दारूची व्यसनं यामुळे १९८० च्या दशकात या गावाने अनेक आव्हानांशी सामना केला. दुष्काळग्रस्त भागात शेतकऱ्यांना दरवर्षी एकाच पिकासाठी पावसावर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय नव्हता. परंतु गावात एकीची मोट बांधून जलसंधारणासह विविध विकासकामे राबवण्यात आली. पुढे गावातील तरूणाईमध्ये एकोपा टिकवण्यासाठी काही पावलं उचलली.




### पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**आदर्शगाव हिवरे बाजारमध्ये बसवण्यात आलेला गणपती ग्रामसंवाद इमारतीत विराजमान आहे. गावाने ५ जून ते २ ऑक्टोबर या कालावधीत ‘एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी’ हा उपक्रम हाती घेतला असून त्याचाच जागर गणेशोत्सवानिमित्त करण्यात येत आहे. गावात एकच गणपती असल्याने मंडळांचा सार्वजनिक उत्सवही एकच आहे. यात सामाजिक उपक्रम व विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होतात. दहा दिवसांचा हा गणेशोत्सव पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतो.**

सन १९९५ चा तो काळ होता. त्या काळी वाड्या-वस्त्यांवर गणपती बसायचे आणि मिरवणुकीवेळी वाद निर्माण व्हायचे. हे वाद गावपातळीवर सोडवले जायचे. मात्र यावर कायमचा तोडगा काढण्यासाठी पद्मश्री पवार यांनी ‘एक गाव एक गणपती’ राबवण्याचा निर्णय घेतला. यंदा या उत्सवाचे हे ३० वे वर्ष आहे.

ग्राम विकास तरूण मंडळ असे नाव या मंडळाला दिले आहे. ग्रामस्थ एकत्र येऊन पूजा करतात. विसर्जनापूर्वी विविध विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतात, तर मिरवणुकीत संपूर्ण गाव एकोप्याने सहभागी होतो. मिरवणुकीला विद्यार्थ्यांचे झांज पथक, लेझीम पथक सहभागी असते.

### एक गाव एक गणपती चळवळ गरजेची

**“राष्ट्रनिर्माणासाठी एकोपा साधण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव महत्वाचा आहे. पण आता व्यसनाधिनता, सोशल मीडिया आणि पर्यावरण असंतुलन वाढले आहे. त्यामुळे ‘एक गाव एक गणपती’ चळवळ पुन्हा नव्या जोमाने उभी करून समस्यांचा जागर झाला पाहिजे.”**

**पद्मश्री पोपटराव पवार**

# जायकवाडीतून तिसऱ्यांदा पाण्याचा विसर्ग सुरू

**नाशिक परिसरात मुसळधार पावसामुळे जलाशय ९९.४७ टक्क्यांपर्यंत भरला**
**नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

**शेवगाव : बाळासाहेब खेडकर**

**मराठवाड्यासह जिल्ह्यातील शेवगाव - नेवासा तालुक्याला वरदान ठरणाऱ्या जायकवाडी जलाशयात गुरुवारी रात्री एकूण पाणीसाठा १०२.१८४६ टीएमसी (९९.४८ टक्के) तसेच उपयुक्त पाणीसाठा ७६.११८४ टीएमसी (९९.२८ टक्के) पर्यंत जाऊन पोहोचल्याने धरण प्रशासनाने जायकवाडीतून गोदावरी नदी पात्रात तिसऱ्यांदा पाण्याचा विसर्ग सोडण्याचा निर्णय घेतला आहे.**

त्यानुसार शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास जलाशयातून गेट क्रमांक १० ते २७ अशी एकूण १८ गेट्स चार फुटांपर्यंत उघडून ७५ हजार ४५६ क्युसेसने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असल्याची माहिती धरण प्रशासनाकडून देण्यात आली.

सध्या जायकवाडी सागर जलाशयात नांदूर मध्यमेश्वर प्रकल्पातून १२,६२० क्युसेसने पाण्याची आवक सुरू आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, घोटी या परिसरात सध्या जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे जलाशयात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे.

गेल्या २४ तासांत जलाशयात ४.८२८९ क्युसेस नवीन पाण्याची भर पडली असून यंदाच्या पावसाळ्यात आतापर्यंत ८०.२११० क्युसेस नवीन पाणी दाखल झाले आहे. शुक्रवारी सकाळी जलाशयाचा एकूण पाणीसाठा ९९.४७ टक्के पर्यंत पोहोचल्याने धरण प्रशासनाने जलाशयातून गोदावरी नदी पात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला असून त्याप्रमाणे ७५ हजार ४५६ क्युसेसने विसर्ग सोडण्यात आला आहे.



आता जलाशयात नवीन पाण्याची आवक बघून विसर्ग कमी-जास्त करण्यात येईल असेही धरण प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले असून गोदावरी नदीकाठच्या जनतेने सावध राहावे, असा इशारा जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी दिला आहे.

शेवगाव तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असले तरी नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, घोटी यासह जलाशयाच्या लाभक्षेत्रात जोरदार पाऊस असल्यामुळे जायकवाडी जलाशय आत्तापर्यंत तब्बल तीन वेळा १०० टक्क्यांच्या आसपास भरला आहे. त्यामुळे यंदा पावसाळ्यात तिसऱ्यांदा धरण प्रशासनाने जलाशयातून गोदावरी पात्रात पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय घेतला असून सायंकाळी पाण्याची आवक कमी झाल्याने विसर्ग कमी करण्यात आल्याची माहिती धरण प्रशासनाने दिली आहे. जायकवाडी जलाशय भरल्याने लाभक्षेत्रातील जनतेत समाधान व्यक्त होत आहे.

(पान १ वरून)

### तर मराठ्यांना ओबीसीमधूनच आरक्षण द्यावं लागेल

३ म्हणजे आरक्षण ५० टक्क्यांच्या वर नेता येणार नाही ही ट्रिपल टेस्ट जर पास झाली तर मराठ्यांना ओबीसीमधूनच आरक्षण द्यावे लागेल,“ असे मत उल्हास बापट यांनी व्यक्त केले आहे.

मराठ्यांना जर ओबीसीमधून आरक्षण मिळाले तर ओबीसीचे आरक्षण कमी होईल म्हणून मराठा विरुद्ध ओबीसी हा संघर्ष सुरू आहे. घटनेचा विद्यार्थी म्हणून माझे स्वतः चे असे मत आहे की आरक्षण हे ५० टक्क्यांच्या वर नेता येणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यामुळे जे मागास ठरतात त्यांनी हे आरक्षण वाटून घेतले पाहिजे यासाठी सामंजस्य असायला हवे आणि राजकीय परिपक्वता असायला हवी. मात्र, मतांच्या राजकारणासाठी प्रत्येक जण राजकीय भूमिकेतून याच्याकडे पाहत असल्याचे देखील बापट म्हणाले आहेत.

दरम्यान, “जरांगे यांची मागणी ही घटनेला धरून योग्य आहे, मात्र प्रत्यक्षात सरकारला ती आता पूर्ण करता येईल असे वाटत नाही. राजकारण्यांनी आता काहीही निर्णय घेतला तरी शेवटी सुप्रीम कोर्टात याचा निर्णय होईल. वेळकाढूपणाने हे प्रश्न आणखी जटील होतात, तेच आत्ता झालेलं आहे. सरकारने आत्तापर्यंत काहीच केले नाही म्हणून सरकारने स्वतःला अडचणीत आणले आहे. या क्षणाला सरकारला हे आरक्षण देणे कठीण आहे,“ असे स्पष्ट मत उल्हास बापट यांनी व्यक्त केले आहे.

### नवी मुंबईत प्रश्न सुटला होता, मग जरांगे परत का आले?

**एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्यात बैठक**

दुसरीकडे, मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन एकनाथ शिंदे हे दिल्लीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीला गेले आहेत. अमित शाह आणि एकनाथ शिंदे यांच्यात जवळपास एक तास बैठक झाल्याची माहिती आहे. या बैठकीत मराठा आरक्षणाबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### भरधाव एसटीच्या धडकेत पत्रकाराचा मृत्यू

पावणे सातच्या सुमारास बारामतीनिरा रस्त्यावर शारदानगर येथे हा अपघात घडला. बारामती आगाराची राज्य परिवहन महामंडळाची बस समोरून येत होती. त्याचवेळी राजेंद्र भागवत आपल्या नातीला शाळेत सोडण्यासाठी दुचाकीवरून शारदानगरकडे जात होते. वळणावरून माळेगावकडून ते शारदानगरकडे वळत असताना भरधाव एसटी बसने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा चुराडा झाला.

या अपघातात राजेंद्र भागवत यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर, स्वरा भागवत गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने बारामतीतील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गेल्या एका महिन्यात वारंवार होत असलेल्या अपघातांनी बारामतीकर हादरले आहेत. ओंकार आचार्य व त्यांच्या मुलींच्या मृत्यूची आठवण ताजी असतानाच पुन्हा घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

### देवदर्शनासाठी निघालेल्यांना कंटेनरची धडक

(रा. बोधेगाव, ता. शेवगाव), आकाश कोळसे, पवन जगताप, किशोर तोर (रा. बाबुलतरा, ता. गेवराई) यांचा समावेश आहे. आणखी दोन जणांचा मृतांमध्ये समावेश झाला असून, त्यांची नावे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेतले असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.



# सप्तरंग महोत्सवात उजळली संस्कृतीची परंपरा!

## पारनेर महाविद्यालयाच्या उपक्रमास पहिल्याच वर्षी राज्यस्तरीय यश

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्य कॉलेजच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सप्तरंग २०२५ या महोत्सवात भारतीय संस्कृतीची परंपरा उजळून निघाली. पारनेर महाविद्यालयाच्या या उपक्रमात राज्यभरातून स्पर्धक सहभागी झाल्याने पहिल्याच वर्षी या महोत्सवाने राज्यस्तरीय यशाला गवसणी घातली.**




पारनेर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित या पारंपारकि नृत्य व गायन महोत्सवाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख व विद्या परिषद सदस्य डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या महोत्सवात अहिल्यानगरसह पुणे, नाशिक, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर आदी जिल्हयांतील स्पर्धक सहभागी झाले होते. विविध पारंपारिक नृत्यप्रकार, सुगम संगीत, लोकगीत, अभंग गायन आणि गवळणी यांनी वातावरण रंगून गेले. महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. हरेश शेळके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर डॉ. प्रांजली भराटे यांनी आभार मानले.

### कलागुणांना वाव

गायन आणि नृत्याची समृध्द परंपरा ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. या परंपरेची जपवणूक करणे ही आपली मोठी जबाबदारी आहे. स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याने व्यक्तिमत्व घडते, कलागुणांना वाव मिळतो आणि नवे कलाकार घडतात.

डॉ. तुकाराम रोंगटे

### राज्यभरातून उत्स्फुर्त प्रतिसाद

या महोत्सवाचे आयोजन करण्यामागचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे हा आहे. सुरूवातीला जिल्हास्तरीय स्वरूपाचा विचार होता. परंतु राज्यभरातून मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे ही स्पर्धा राज्यस्तरावर नेण्याचा आम्हाला आनंद आहे.

डॉ. रंगनाथ आहेर

### सांस्कृतिक परंपरेला नवा आयाम

डॉ. तुकाराम रोंगटे यांनी पुढे सांगितले की, संगीत आणि नृत्य ही फक्त कला नाही तर आत्म्याला स्पर्श करणारी साधना आहे. विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांतून सहभागी होत आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधावा. परंपरा जपली तरच नवे कलाकार घडतील व संस्कृती बहरत राहील.

### सुरेख सुराटींनी झाले उद्घाटन

उद्घाटन सत्राची सुरूवात प्रा. ज्ञानेश्वर गुलगे यांनी सादर केलेल्या मंगलमय गणेशवंदनेने झाली. त्यानंतर महाविद्यालयातील प्रा. आदेश चव्हाण यांनी संस्था गीत सादर करून कार्यक्रमात भावपूर्ण रंगत आणली. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा, लोकनृत्याच्या तालावर सादर केलेली कला पाहून उपस्थित प्रेक्षकांनी टाळयांच्या गजरात दाद दिली.

### सांस्कृतिक रंगत आणि सर्वांगीण विकास

या महोत्सवाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच परिसरातील रसिक प्रेक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. विविध कलाप्रकारांतून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, नेतृत्वगुण व व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळत असल्याचे जाणवले. सप्तरंग २०२५ या महोत्सवाने केवळ पारंपारिक कलांना व्यासपीठ दिले नाही तर विद्यार्थ्यांच्या सांस्कतिक जाणिवांनाही नवसंजीवनी दिली.

# उपवासात दृढ श्रध्दा, जैन भगिनींचा सत्कार

## धर्म व संस्कृतीचा संगम । तेजल गांधी, सारिका लोढा, निकिता गांधी यांचा आदर्श

निघोज : प्रतिनिधी

**निघोजमध्ये जैन भगिनींनी उपवास पूर्ण करून धार्मिक समर्पणाचे अद्वितीय उदाहरण सादर केले, ग्रामस्थ आणि जैर समाज बांधवांनी उत्साहपूर्ण सत्कार व आनंदोत्सवाने त्यांचा गौरव केला.**



जैन भगिनी तेजल अमित गांधी यांनी आठ, सारिका सुदर्शन लोढा यांनी तीन तर निकीती संजयकुमार भंडारी यांनी एक उपवास करून जैन धर्मातील उपवास परंपरेचे जतन केले. त्यांचा जैन समाज बांधव आणि ग्रामस्थांनी कपिलेश्वर मंगल कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी सचिन साखला, संतोष भंडारी, सचिन वराळ, सरपंच चित्राताई वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, सुदर्शन लोढा, शुभम गांधी, राजेश भंडारी, अक्षय भंडारी, विनोद लोढा, सचिन मुथीयान, मनोज लोढा, संदीप भंडारी, अमर भंडारी, नितीन लोढा, मयुर गुगळे, रामलाल गांधी, आनंद मनोत, विपुल फिरोदिया, यश लोढा, प्रविण गांधी, प्रसन्न गांधी आदी. उपस्थित होते.

कार्यक्रमात ग्रामस्थ आणि जैन बांधवांनी उपवासाचे महत्व आणि फायदे याबाबत विवेचन केले. यावेळी उपस्थितांना मिष्टांन्न भोजन देण्यात आले. सोमनाथ वरखडे, सुदर्शन लोढा, शुभम गांधी यांनी सुत्रसंचलन तर बाळासाहेब गांधी यांनी आभार मानले.

### रथामध्ये मिरवणूक

कार्यक्रमाच्या प्रारंभी तिनही भगिनींची आकर्षक रथामधून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीच्या अग्रभागी प्रसिध्द बँड पथक होते. जैन समाजातील युवक, ज्येष्ठ मंडळी व महिला भगिनींनी बँडच्या तालावर नाचत आनंद व्यक्त केला.

### धार्मिक संदेश

जैन धार्मत उपवासाचे महत्व केवळ शरीराची तपस्या नव्हे तर मनाची शुध्दता साधण्याचा मार्ग आहे. उपवासातून संयम, आत्मनियंत्रण आणि मानसिक शुध्दता साधता येते. महिला भगीनींनी उपवास करून धार्मिक संस्कृती जपली आणि युवा पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

### आनंदऋषीजींच्या शिकवणीचा आदर्श

जैन समाज बांधव व्यवसायात प्रामाणिक असून, धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रभागी आहेत. महिला भगिनींनी कडक उपवास करून धार्मिक संस्कृती जपली असून आनंदऋषीजी महाराजांच्या शिकवणीचा आदर्श ठेऊन मार्गदर्शन करत आहेत. उपवासातून मिळणारी मानसिक शुध्दता, संयम आणि समाजसेवेची प्रेरणा सर्वांसाठी आदर्श ठरले.

सचिन वराळ

### धार्मिक संदेश

जैन धार्मत उपवासाचे महत्व केवळ शरीराची तपस्या नव्हे तर मनाची शुध्दता साधण्याचा मार्ग आहे. उपवासातून संयम, आत्मनियंत्रण आणि मानसिक शुध्दता साधता येते. महिला भगीनींनी उपवास करून धार्मिक संस्कृती जपली आणि युवा पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

### धार्मिक शिक्षण व सामाजिक एकात्मतेचे उदाहरण

उपवास आणि श्रध्देच्या या कार्यक्रमातून जैन समाजातील महिला भगिनींच्या कर्तृत्वाचा गौरव केला गेला. धार्मिक समर्पण, सामाजिक सहभाग आणि आनंदोत्सवाचा संगम असलेल्या या कार्यक्रमातून उपवासाचे महत्व अधोरेखित झाले. हा उपक्रम जैन धर्मातील धार्मिक शिक्षण व सामाजिक एकात्मतेचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

# नवनवीन ज्ञान आत्मसात करून उत्कर्ष साधा

## प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांचे प्रतिपादन
## ढोकेश्वर विद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटन

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून महाविद्यालयात नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे. शिक्षण ही फक्त शाळा किंवा महाविद्यालयात मिळालेली माहिती नाही, तर आपले जीवन समृध्द करणारे साधन आहे. नवनवीन ज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांनी जीवनाचा उत्कर्ष साधवा असे आवाहन डॉ. सहदेव आहेर यांनी केले.**




टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटन नुकतेच पार पडले. निघोजच्या श्री मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात विद्यार्थीनींसाठी रांगोळी आणि पुष्परचना स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत विद्यार्थिनींनी आपली सर्जनशीलता आणि कलात्मक क्षमता सिध्द केली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याने कार्यक्रम रंगतदार ठरला. विज्ञान शाखाप्रमुख प्रा. नामदेव वाल्हेकर यांनी प्रास्ताविक, प्रा. संकेत ठाणगे यांनी सुत्रसंचलन तर प्रा. सीमा रोहोकले यांनी आभार मानले.

### आत्मविश्वासाने वाटचाल करा

डॉ. आहेर यांनी नोबेल पुरस्कारांविषयी माहिती देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विद्यमान क्षमता ओळखण्याचे महत्व विषद केले. विद्यार्थ्यांनी आत्मचिंतन करून आत्मविश्वासाने वाटचाल करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### स्वयं रोजगार निर्माण करा

एआय, चॅटजीपीटी या नवनवीन तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून ज्ञान संपादन करावे. तसेच सायन्स असोसिएशनच्या माध्यमातून विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन इनक्युबेशन, इनोव्हेशन आणि एंटरप्रेन्योरशिप यांसारख्या उपक्रमातून स्वयं रोजगार निर्माण करावा.

डॉ. लक्ष्मण मतकर, प्राचार्य

# राजयोग ध्यानाने नकारात्मकतेवर विजय

## साधना दिदींचा संदेश । पानोली येथे नशामुक्त भारत अभियान
## ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचा उपक्रम

पानोली : प्रतिनिधी

**आजच्या युगात वाढत्या व्यसनधीनतेमुळे तरूण पिढीचे भवितव्य धोक्यात आले आहे. यावर प्रतिबंध घालण्यासाठी व मुल्याधारित समाज निर्माण करण्यासाठी पारनेर येथील प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे केंद्राच्या वतीने पानोली येथे नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात आले. यावेळी बोलताना साधना दिदी यांनी राजयोग ध्यानाने नकारात्मकतेवर विजय प्राप्त करता येतो असा संदेश दिला. अभियानात जि प प्राथ. शाळा व नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.**



या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रमनाज शेख हे होते. ब्रम्हकुमारी समन्वयक साधना दिदी, साधक राम भाई, पत्रकार भगवान गायकवाड, संभाजी थोरात, रामदास चौरे, संगीता लोंढे, भारती गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचलन रामदास चौरे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाच्या घातक परिणामांवर प्रकाश टाकत समाजोपयोगी उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. ईश्वरीय परिवाराच्या वतीने आभार माणण्यात आले.

### विद्यार्थ्यांची व्यसनमुक्तीची शपथ

कार्यक्रमाच्या प्रारंभी शेकडो विद्यार्थ्यांकडून व्यसनांपासून दूर राहण्याची, निरोगी जीवन जगण्याची आणि समाजात आदर्श निर्माण करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी ओजस्वी घोषणांनी संपूर्ण विद्यालय परिसर दुमदुमून गेला.

### सामाजिक परिणाम

या कार्यक्रमातून केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर गावकऱ्यांनाही व्यसनमुक्तीचा मजबूत संदेश मिळाला. शालेय वयातच व्यसनमुक्त जीवनाची प्रतिज्ञा करून भावी पिढी सक्षम, निरोगी आणि मूल्याधिरित समाज घडवेल असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. नशामुक्त भारत ही केवळ घोषणा न राहता, ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आशा सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

### मन, बुध्दी व संस्काराचे संतुलन

मानवाची जीवन श्रेष्ठ आणि सुंदर होण्यासाठी मन, बुध्दी व संस्कार या तीन शक्तींचे संतुलन आवश्यक आहे. गणेश पूजेत वापरली जाणारी त्रिदळी दुर्वा हीच याचे प्रतीक आहे. राजयोग ध्यानामुळे मनातील नकारात्मक विचार शांत होतात, विचारांची गती स्थिर होते आणि स्मरणशक्ती तसेच निर्णयक्षमता वाढते. त्यामुळे व्यसनासारख्या नकारात्मक सवयींपासून मुक्ती मिळू शकते.

ब्रम्हकुमारी साधना दिदी

# चिखलात अडकले शेतकरी, प्रशासन निद्रिस्त !

## ग्रामस्थांचा संताप, रस्त्यात चिखल की चिखलात रस्ता ?
## गाडीलगांव-निघोज रस्त्याची तऱ्हा

गाडीलगांव : प्रतिनिधी

**गाडीलगांव ते निघोज हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ता गेल्या चार-सहा महिन्यांपासून रखडला आहे. ठेकेदार आणि प्रशासनाने खडी टाकून त्यावर मुरूम ओतला, पण डांबरीकरणाआधीच काम ठप्प**



**झाले आहे. परिणाम काय तर रस्त्यावर पावसाचे पाणी साचून चिखल तयार झाला. आज स्थिती अशी की रस्त्यात चिखल की चिखलात रस्ता हा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासन मात्र निद्रिस्त आहे.**

### जीव धोक्यात घालून प्रवास

या रस्त्यावरून प्रवास करणारे ग्रामस्थ, शेतकरी आणि विद्यार्थी रोजच्या रोज धोक्याच्या दाराशी उभे ठाकले आहे. दुचाकी घसरून पडणे, गाडया थेट चरात जाणे, प्रवाशांना मार लागणे हे प्रकार रोज घडत आहेत. काल परवाच्या पावसाने रस्त्यावर पाणी साचल्याने लोकांच्या गाड्या अडकल्या, काही घसरल्या, काहींचे नुकसान झाले तर काही प्रवासी जखमीही झाले.

### दुचाकी घसरून चार फुट चरात

मुकसमळा येथे मी दुचाकीवरून जात असताना दुचाकी घसरून चार फुट खोल चरामध्ये गेली. त्यात गुडघ्याला दुखापत झाली. अंधार असल्याने मोबाईल, पिशवी सापडत नव्हते. जीव वाचवणे कठीण झाले होते.

वैशाली गाडीलकर, महिला प्रवासी

### रस्ता नव्हे, मृत्यूचा सापळा

चिखलामुळे दुचाकीचे पुढील चाक लॉक झाले आणि दुचाकी घसरली. दुचाकीचे मोठे नुकसान झाले. पायाला मार लागला. हा रस्ता आता रस्ता राहीला नाही तर मृत्यूचा सापळा ठरला आहे.

मनोज गाडीलकर, शेतकरी

### गावकऱ्यांचा संताप

ग्रामस्थांचा रोष आता प्रचंड वाढला आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन बाजारात नेणे कठीण झाले आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना जीव मुठीत धरावा लागत आहे. रूग्णवाहिकेला अडकावे लागले तर थेट जीवावर बेतू शकते. आमच्या जीवाशी खेळ करणारे ठेकेदार आणि प्रशासन जबादार नाहीत का ? रस्त्यात चिखल की चिखलात रस्ता हा तमाशा किती दिवस सुरू राहणार असे संतप्त सवाल गावकरी करत आहेत.

# निघोज ग्रामपंचायतमध्ये विकासाची गती

## सरपंच पंकज कारखिले यांचे गौरवोद्गार

निघोज : प्रतिनिधी

**निघोज ग्रामपंचायतमध्ये विकास कामांची गती वाढत असून उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेली कामे कौतुकास्पद आहे. ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्यासाठी निघोज ग्रामपंचायतने मोठ्या प्रमाणात विकास कामे मार्गी लावली असून त्यात स्थानिक नेतृत्वाचा मोठा वाटा असल्याचे सरपंच पंकज कारखिले यांनी सांगितले.**



निघोज -अळकुटी मार्गावरील दर्याचा मळा ते लामखडे वस्ती मजबुतीकरणासाठी ११ लाख रूपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्याचे भुमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

याप्रसंगी चंद्रकांत लामखडे, भाऊसाहेब लामखडे, रामदास रसाळ, बबनराव वरखडे, उत्तमराव वरखडे, दादाभाऊ लामखडे, दत्ता लामखडे, ज्ञानेश्वर वरखडे, दिपक लामखडे, संतोष वरखडे, गुणाजी रसाळ, अनिल जाधव, तुषार लामखडे, सचिन दुतारे आदी मान्यवर उपस्थित होते.

### उत्कृष्ट विकासकामे

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना ग्रामपंचायत मार्फत राबविण्यात येत आहेत. या संधीचा उपयोग करून गावांतरील विकास कामे करण्यात येत आहे. निघोज ग्रामपंचायत तालुक्यातील सर्वाधिक मोठी ग्रामपंचायत असून उपसरपंच वरखडे याच्या नेतृत्वाखालीली कामे उत्कृष्ट आहेत.

पंकज कारखिले, सरपंच, राळेगणथेरपाळ

### सामजिक आणि धार्मिक सेवाभाव

उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांचे काम कौतुकास्पद आहे. त्यांनी कार्यक्षमतेने गाव व परिसरात विकासकामे राबवली असून सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील सेवाभावही त्यांनी जोपासला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गावकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.

चंद्रकांत लामखडे
मा. सरपंच

### ज्येष्ठांचे मार्गदर्शन, युवकांचे पाठबळ

उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी ग्रामपंचायतच्या माध्यमातून झालेल्या विकास कामांची माहीती दिली. त्यांनी सांगितले की, ग्रामपंचायत सदस्य एकत्र काम करत असून ज्येष्ठ ग्रामस्थांचे मार्गदर्शन आणि युवकांचे पाठबळ मिळत असल्याने विकास कामे जलद व परिणामकारक पध्दतीने होत आहेत.

# घाटाचा सम्राट सर्जा काळाच्या पडद्याआड

## स्व. झुंबरशेठ आंधळे यांच्या कष्टातून तयार झालेल्या सर्जाची एक्झिट

कर्जुलेहर्या : प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतीची परंपरा आणि त्यामधलं थरारांच स्वरूप अनेकांची मने जिंकून घेतं. या जगतात एक वेगळा दबदबा गाजवणारा, नगर जिल्ह्याची ओळख ठरलेला शिर्डीवाला सर्जा शुक्रवारी अखेर सर्वांच्या आठवणींमध्ये सामावला. स्व. झुंबरशेठ आंधळे यांच्या कुटुंबाचा अभिमान असलेल्या सर्जाने समीपच्या अंतिम श्वासाने संपूर्ण बैलगाडा विश्वाला भावुक करून सोडले.



### स्व. झुंबरशेठ आंधळे यांची जोपासणा

स्व. झुंबरशेठ आंधळे हे फक्त बैलगाडा मालक नव्हते तर त्यांनी बैलांना मुलांसम जोपासले, त्यांच्यावर प्रेम, तळमळ आणि जिद्दीने संस्कार केले. शिर्डीवाला सर्जाचे संगोपन, आहार, रोजचा सराव, शर्यतपूर्व तयारी या सगळ्या गोष्टीत झुंबरशेठ यांचे योगदान असे. सर्जाची जिद्द, ताकद, आक्रमकता हाच झुंबरशेठ आणि त्यांच्या परिवाराच्या मेहनतीचा परिणाम होता. सर्जाचा लौकिक आसमंतात पसरला आणि नगर जिल्ह्यातून राज्यभर त्याच्या नावाचा गजर घुमू लागला. सर्जाने विविध प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकून अर्धशतकांहून जास्त मोठया शर्यती जिंकल्या. जिद्दीने फड जिंकणं, अडथळयांवर मात करणं आणि दमदार उधळणं या त्याच्या खासीयत होत्या.

### दत्तूशेठ आंधळे यांचेही योगदान

स्व. झुंबरशेठ आंधळे यांच्या खांद्याला खांदा लाऊन त्यांचे बंधू, उद्योजक तथा हरेश्वर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष दत्तूशेठ आंधळे यांनीही सर्जाच्या संगोपनात योगदान दिले. स्व. झुंबरशेठ यांच्या पश्चात सर्जाची जबाबदारी त्यांनी चोखपण सांभाळली. सर्जाच्या आठवणी सांगताना ते भावूक झाले होते.

### बुलंद झुंजार प्रवास, घाटातल्या फडाचा हिरो

शिर्डीवाला सर्जा हा बैलगाडा शर्यतींतील जिवंत दंतकथा ठरला होता. पुणे जिल्ह्यातील प्रमुख घाटांमधून त्याचा अदम्य जोश, वेग आणि असामान्य ताकद यामुळे वारंवार घाटाचा राजा हे बिरूद त्याने जिंकले. प्रत्येक फळीफोड शर्यतीत सर्जा दमदार कामगिरी करत असे. आजवर त्याने राज्यभरातील विविध घाटांमध्ये असंख्य बक्षिसं, पदके मिळविली. हा विजय केवळ सर्जाचा नव्हता तर स्थानिक गावकऱ्यांचा अभिमानही होता.

### अंतिम निरोप

शुक्रवारी शिर्डीवाला सर्जाने आपला जीवनप्रवास संपवला. या बातमीने बैलगाडा शर्यतप्रेमींमध्ये शोककळा पसरली. अनेकांनी त्याच्या आठवणी शेअर केल्या. तो घाटावर दणदणाट करत उधळायचा, त्याच्या लयीत भल्या-भल्यांना मागे टाकायचा दिवसभर त्याच्याच नावाचा गजर असायचा असे सचिन गोडसे यांनी सांगितले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com